ISSN No. 2394-9996

# New Vision

## Multi-disciplinary Research Journal

January 2017

Online version : http://www.milliyaresearchportal.com

Anjuman Ishat -e- Taleem Beed's
Milliya Arts, Science & Management Science College,
Beed- 431122 (Maharashtra)
Website : www.milliyasrcollege.org
E-mail.ID : newvisionjournal@gmail.com

Scanned by CamScanner

| Sr. No. | Title of Research Paper | Author | Sub | P.No. |
|---|---|---|---|---|
| 14 | अल्मा कबूतरी में चित्रित संघर्षशील नारी | प्रा. डॉ. चित्रा धामणे | हिंदी | 54 |
| 15 | विज्ञापन में नारी का अस्तित्व | प्रा.आहेर संगीता एकनाथराव | हिंदी | 57 |
| 16 | विकलांग-विमर्श कारण तथा चुनौति | डॉ. ओमप्रकाश बन्सीलाल झंवर | हिंदी | 60 |
| 17 | 'जनता का मोर्चा' नाटक में साम्प्रदायिक सद्भाव एवं राष्ट्रीय एकात्मता | प्रा. संतोष नागरे | हिंदी | 64 |
| 18 | धूमिल के काव्य में जनवादी चेतना | डॉ. सय्यद अमर फकिर | हिंदी | 67 |
| 19 | 'जीवन हमारा' में व्यक्त शोषण, दमन और रूदन | प्रा. प्रकाश गायकवाड | हिंदी | 71 |
| 20 | शांता शेळके यांची भाषाशैली | डॉ. सरकटे सदाशिव | मराठी | 75 |
| 21 | 'संभूती' कृषी जीवनाशी निगडीत स्त्रीच्या जीवनातील फरफट रेखाटणारी कादंबरी | स.प्रा. ढास रवींद्र | मराठी | 81 |
| 22 | दलित साहित्यातील मानवता | प्रा. नामदेव शिनगारे | मराठी | 84 |
| 23 | दौलताबाद शहराचे महत्त्व | डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन | इतिहास | 89 |
| 24 | मुक्ती संग्रामातील योध्दा | प्रा. हुसेन ईमाम<br>प्रा. मोहन जगन्नाथ काळकुटे | इतिहास | 92 |
| 25 | नवभारत निर्मितीत स्वामी विवेकानंदाचे शक्तीदाय विचार | प्रा. श्रीमती सुनिता शंकरराव कुरूडे | इतिहास | 94 |
| 26 | सामाजिक समायोजनामध्ये वर्तन एक महत्त्वपूर्ण घटक | प्रा. मलेका शाहिन अब्दुल गफार | गृह विज्ञान | 98 |
| 27 | " सावित्री फुलेंचे स्त्री चळवळीतील योगदान व आजची महिला " | प्रा. जाधव एस.बी. | गृह विज्ञान | 100 |
| 28 | "संत साहित्यातील आहार विचार " | डॉ. शिल्पा खोत-देशपांडे | गृह विज्ञान | 104 |





Scanned by CamScanner

ISSN No.2394-9996

# दौलताबाद शहराचे महत्त्व

**डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन**
इतिहास विभाग प्रमूख
मिल्लिया कला व विज्ञान
महाविद्यालय, बीड.

औरंगाबादच्या पश्चिमेला दौलताबाद हे शहर वसलेले आहे. औरंगाबाद व दौलताबाद मध्ये १३ किलो मीटरचे अंतर आहे. दौलताबादचे जूने नाव देवगीरी होते. देवगीरी हे शहर बाराव्या शतकाच्या शेवटी यादवांची राजधानी होती. हा काळ यादवांच्या उत्कर्षाचा काळ होता.

इ.स. ११८७ मध्ये यादव घराण्यातला राजा भल्लम पाचवा या परिसरातून आपल्या फौजे सह जात असतांना सध्याचा दौलताबाद किल्ला ज्या ठिकाणी उभा आहे. त्या पर्वताने तो फार आकर्षीत झाला. त्यांने त्याच पर्वतावर एक किल्ला पर्वत कोरून बनवीला. त्या किल्ल्याला देवगीरी नाव दिले. म्हणजे ज्या ठिकाणी देवता निवास करतात ती जागा राजा भल्लम पाचवा याने देवगीरीला आपली राजधानी बनवीली. देवगीरी किल्ल्याच्या आजू बाजूला एक शहर अस्तित्त्वात आले त्या शहराला देवगीरी शहर म्हटले जाऊ लागले.

यादवांच्या काळात देवगीरी हे शहर फक्त राजकीय केंद्रच नव्हते तर कला व ज्ञान, उद्योग, व्यापाराचे केंद्र ही होते.[१] तेथील फूल, फळे, संपुर्ण भारतात परदेशात प्रसिध्द होते. येथील संगीतकार ही उत्तम होते. शिल्पकला, वास्तूकला, मराठी संस्कृत साहित्य याच काळात विकसीत झाले फेरिश्ता आपल्या गुलशन-ए-इब्राहिमीया पुस्तकात लिहितो की दौलताबाद येथील संपत्ती सोने चांदी, जडजवाहीर ची माहिती ऐकून दिल्लीचा सुलतान अलाऊद्दीन खिलजी याने इ.स. १२९४ मध्ये यादव राजा रामचंद्र देवला पराभूत करून तेथील संपत्ती त्यांने दिल्लीला नेली होती. राजाराम चंद्रच्या निधनानंतर अलाऊद्दीन खिलजीने देवगीरीला आपल्या राज्यात विलीन केले. अलाऊद्दीन खिलजीच्या निधनानंतर त्याचा मूलगा कूतबोद्दीन मूबारक खिलजी सत्तेत आला त्याच्या काळात देवगीरीच्या हरपाल देवने बंड पुकारले. बंडचा बिमोड करण्यासाठी तो स्वतः १३१८ मध्ये देवगीरीला आला. ``त्याच्या बरोबर हिंदी व उर्दूचे प्रसिध्द कवी हजरत अमीर खूसरौ हे ही होते. येथील नैसर्गीक वातावरणाने ते फार प्रभावीत झाले होते.``[२]

खिलजी घराण्याच्या अस्तानंतर तूघलक घराणे दिल्ली मध्ये सत्तेवर आले ``इ.स. १३२५ मध्ये मोहम्मद तूघलकने सत्तेची सुत्रे हाती घेतली. तो फार बुध्दीमान व धैर्यशाली सुलतान होता. त्याला लष्करी व राजकीय दृष्टीने देवगीरी चे महत्त्व पटले. देवगीरी शहर त्याच्या राज्याच्या मध्यभागी होते त्यामुळे त्याने देवगीरीला आपल्या राज्याची राजधानी बनविण्याचे ठरविले,`` त्यामुळे किंवा त्या दृष्टीने देवगीरी शहरा विषयी नियोजन आखुन त्या ठिकाणी बांधकाम सुरू केले १३२७ मध्ये त्याने दिल्ली वासीयांना देवगरी येथे स्थलांतर करण्याचे आदेश जारी केले . त्या मध्ये उलेमा, सुफी, कवी, व सामान्य लोकांचा समावेश होता. त्याने आपली राजधानी देवगीरीला येथे स्थलांतर केली. मोहम्मद तूघलक याने देवगीरीचे नाव बदलुन दौलताबाद ठेवले दौलताबाद येथे त्याने मोठे महाल, बाग बगीचे, स्नानगृहे, धर्म शाळा, मस्जिदी व ईतर इमारती बांधल्या, दक्षिणेतील एका शहराला भारताची राजधानी होण्याची संधी पहिल्या वेळी प्राप्त झाली.

प्रसिध्द इतिहासकार शहाबुद्दीन अलअमरी याने दौलताबाद शहरा विषयी लिहिले आहे की दौलताबाद देवगीरी हे भारताचा राजधानीचे शहर आहे.

तुघलक काळा विषयी परकीय प्रवासी इब्न-ए-बतूता आपल्या शहराला नावाच्या प्रवास वर्णनात लिहितो की, देवगीरी (दौलताबाद) हे एक मोठे शहर आहे. या ठिकाणी एक फार मोठा किल्ला आहे. मजबूतीच्या बाबतीत त्या किल्ल्याची तूलना दुसऱ्या कोणत्याही किल्ल्याशी होऊ शकत नाही.



Scanned by CamScanner

इ.स. १३४१ मध्ये मोहम्मद तूघलख याने आपल्या राज्याची राजधानी पुन्हा दौलताबाद हुन दिल्लीला, स्थलांतरीत केली. १३४७ मध्ये अलाऊद्दीन हसन बहमनी याने दौलताबाद मध्ये आपल्या स्वतंत्र राज्याची घोषणा केली व बहमनी राज्याची स्थापना केली. मोहम्मद शहा बहमनीचा मुलगा अलाऊद्दीन याने दौलताबादचे नाव बदलून फत्तेहबाद ठेवले होते. परंतु हे नाव अधिक प्रसिध्द झाले नाही.

पंधराव्या शतकाच्या शेवटी बहमनी राज्याचे पाच तूकडे झाले. दक्षिणते पाच शाह्या अस्तित्वात आल्या. दौलताबाद अहमद नगरच्या राज्याचा एक भाग होता. इ.स.१६३२ मध्ये मोगल बादशाह शाहजहाँ याने अहमद नगरचे राज्य जिंकून घेतले व दौलताबाद मोगल राज्याच्या एक भाग बनला. इ.स. १७२४ मध्ये मीर खमरूद्दीन अली खान निझामूल-मूल्क आसेफ जाह प्रथम याने दक्षिणेत आपले स्वतंत्र राज्य घोषीत केले. दौलताबाद हे शहर १९४८ पर्यंत निझाम राज्याच्या ताब्यात होते. दौलताबाद हे शहर आज एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ आहे. दररोज हजारो देशी व विदेशी पर्यटक दौलताबाद व तेथील किल्ला पाहण्यासाठी येतात. वेगवेगळ्या राजघराण्याचे जय व पराजयाचे विविध परीणाम दौलताबाद शहरावर झाले. मध्यकाळामध्ये शहराच्या संरक्षणासाठी शहराच्या बाहेरून तटबंदी कींवा सुरक्षा भींत बांधली जात होती. दौलताबाद शहराच्या संरक्षणासाठी शहराच्या बाहेरून सुरक्षीत भींत कींवा तटबंदी १६१० ते १६१५ या काळात दगड व चून्याचा वापर करून मलिक अंबरने बांधली होती. ही तटबंदी अडीच मैल लांब आहे. तटबंदीला अंबर कोट असे म्हणतात. त्या तटबंदीला ४५ बूरूज व ९ दरवाजे आहे तटबंदीची उंची ३० ते ४० फूट आहे. तर रूंदी १५ फूट होती. तटबंदीची उंची ३० ते ४० फूट आहे. तर रूंदी १५ फूट होती. बुरूजांची उंची ४८ फूट होती. दरवाजांच्या बाजूस पहारेकऱ्यांना थांबण्यासाठी मोकळी जागा आहे. दरवाजांच्या आतील भागावर वाघ, हत्ती, मोट, फूले, आणि इतर गोष्टी दगडावर कोरलेल्या आहे. आज ही या तटबंदीचा उत्तर व पश्चिमेचा भाग व काही दरवाजे सुस्थितीत आहे.

दौलताबाद परीसरामध्ये संस्कृती, ज्ञान, साहित्य, आणि विविध कलांचा विकास झाला. तेथील संतांनी व सूर्फीनी सामाजीक व आर्थीक चळवळीच्या माध्यमातून विविध समाजांना आपसात जोडण्याचा व बंधूभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यादव काळातील श्री. चक्रधर स्वामी यांनी एक चळवळ चालवीली होती. त्या चळवळीला महानूभव चळवळ असे म्हणतात. ती चळवळ फार प्रसिध्द झाली त्या चळवळीला मानणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच गेली. आज महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी याच चळवळीशी संबंधीत मंदिरे आणि मठ अस्तित्वात आहे चक्रधर स्वामी यांनी लिहिलेली पुस्तक लिला चरित्र`` मराठी साहित्यात व भारतीय समाजात पुस्तकाला महत्त्वाचे स्थान आहे. दौलताबाद मध्येच जनार्दन स्वामी यांनी मराठी शाळेत जानकी स्वेंबर नावाची पुस्तक लिहिली जी धार्मीक दृष्ट्या एक महत्त्वाची पुस्तक मानली जाते. त्यांची समाधी दौलताबादच्या किल्ल्यावर आहे.

इ.स. १२०० मध्ये प्रसिध्द सूफी हजरत मोमीन आरेफ देवगीरीत आले. ह्यांचा दर्गा दौलताबादच्या पूर्वेला एक किलो मीटर अंतरावर आहे. यांच्यानंतर हजरत शाह जलालूद्दीन गंजेर खाँ रह, हजरत मून्तजबोद्दीन जरजरीजर बख्श रह., हजरत बुऱ्हानोद्दीन गरीब रह या सारखे अनेक सूर्फीच्या खॉनखाह या ठिकाणी होत्या. परंतू सध्या हा परिसर खूल्दाबाद या नावाने ओळखला जातो. हजरत खॉजा मोहम्मद राजू खत्ताल रह. मोहम्मद तूघलखच्या ताफ्या बरोबर दौलताबादला आले होते. यांनी दकनी भाषेत एक मसनवी लिहीली होती तीचे नाव सूहागन असे होते. ही उर्दू साहित्यातील पहिली मसनवी मानली जाते. मसनवी म्हणजे उर्दू कवीतेचा एक प्रकार आहे.

दौलताबादच्या किल्ल्याच्या समोर काही अंतरावर शेख चाँद बोधले यांचा मझार व मज़बूत मख़बरा बांधलेला आहे. संत मानपूरी बाबा यांची दौलताबाद मध्ये समाधी आहे. ह्यांचे औरंगाबादचे प्रसिध्द सुफी हजरत शाहनूर बाबाशी मैत्री पुर्ण संबंध होते किल्ल्याच्या परिसरामध्ये हजरत फखीर सूलतान, हजरत पीर खूद्दस हजरत हाजी खत्ताल चे मझार आहे. दौलताबादच्या परिसरामध अनेक सुर्फीचे दर्गाह आहे या मध्ये हजरत शेख बहाऊद्दीन अन्सारी, हजरत हाफेज, सलाहूद्दीन झिया, हजरत दादा पीर बाबा, खड पीर बाबा, मलीक शाह भंडारी, आदी ईत्यादी दौलताबाद हे शहर जे एके काळी मोठे शहर होते ज्ञानाचे केंद्र होते. आज त्या शहरा पूर्वी सारखे रूप राहिलेले नाही. ऐतिहासिक दृष्ट्या दौलताबादचे आज ही महत्त्व आहे. हजारो देशी व परदेशी पर्यटक दौलताबाद शह व तेथील किल्ला पाहण्यासाठी दररोज येतात. जगामध्ये जे महत्त्वाचे किल्ले अस्तित्वात आहे. त्या किल्ल्या मध्ये दौलताबादच किल्ल्याच्या समावेश होतो.



Scanned by CamScanner

## संदर्भ Reference :-


१) तारीख के झरोको से :- लेखक :- डॉ. मिर्झा मोहम्मद ख़िज़र बेग,
पान. क्र. २२. प्रकाशक अख़्तर पब्लिकेशन,
अखतर कदा हिमायत बाग औरंगाबाद.

२) तारीख के झरोको से :- लेखक :- पान क्र. २३

३) तारीख के झरोको से :- लेखक :- पान क्र. २६.

४) तारीख-ए- फेरिश्ता :- लेखक :- मोहम्मद क़ासीम फेरिश्ता, उर्दू,
अनुवाद :- अब्दूल हयी खॉजा डॉ. अब्दूल रहेमान खंड पहिला व दूसरा,
प्रकाशक :- अय्युब प्रकाशक देवबंद जिला सहारनपूर, उत्तर प्रदेश.

५) महाराष्ट्रातील किल्ले:- लेखक :- तापीकर,

६) Forts Of India :- Amit Verma.




Scanned by CamScanner

जन हितमें जारी



स्वच्छ भारत

एक कदम स्वच्छता की ओर

Scanned by CamScanner